# कथा आजी - आजोबांची।

आजकाल बऱ्याच घरांमध्ये मुलं कुठेतरी बाहेरगावी आणि आई-बाबा घरी असल्याचे चित्र दिसते. आता मुलगा किंवा मुलगी असा फरक राहिला नाही. दोघेही त्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी पळत असतात. नव्हे त्यांना तसे रहावेच लागते. त्यासाठी घराबाहेर पडावेच लागते. मग घर अगदी सुनं-सुनं होते. सतत आपल्या अवती-भोवती फिरणारी पाखरं दूर गेली की आई-वडिलांना खूपच जाणवते. त्यांच्या आवडीचे पदार्थ समोर आले की मग डोळेच पाणावतात.

मुलांना कधी शिक्षणासाठी, कधी नोकरीसाठी बाहेर पडावे लागते. मग ते देशात असो वा परदेशात जाणे असले तरीही घर, सर्व नातेवाईकांना सोडून जाताना खूप त्रास होत असतोच. पण आपली प्रगती व्हावी हे, आपल्या संधींचा सदुपयोग करण्यासाठी त्यांना जावेच लागते. मुलीलाही पुढे लग्न झाल्यावर कायमचेच घर सोडावे लागते. एका नव्या जीवनाची सुरुवात करायची असते. हे सर्व होत असताना लग्नानंतर, एखादे नातवंड झाल्यावर जर मुलांनी लांब जावे लागले तर मग बघायलाच नको. नातवंड हे दुधावरची साय असते. ते लहान असताना त्यांच्या बाललीला पहात त्यांची वाढ होताना पहाणे हे शब्दशः स्वर्गसुख. या सुखाला मुकण्याचे खूप दुःख होते. पण हे सगळे असले तरी मुलांना मिळालेली संधी, त्यांची उन्नती पहाण्याचा आनंद या गोष्टींवर मात करतं.

अशीच घटना आमच्याही जीवनात घडली बरं का! मुलाची मुलगी खूपच लहान होती, तेव्हाच मुलाला परदेशी जाण्याचा योग आला. आणि तोही अमेरिकेला. आम्हा सर्वांनाच खूप आनंद झाला. अभिमानाने व कौतुकाने ऊर भरून आला. तयारी सुरू झाली. प्रत्येकजण त्यांना मदत करत होते. धावपळ चालू होती नुसती. जायचा दिवस जवळ येई तसतसे डोळे पाणावत होते. आणि अखेर त्यांच्या विमानाने उड्डाण केले.

त्यांचे फोन, व्हिडिओ कॉल्स सुरू झाले. आता विज्ञानाने ही चांगली सोय केल्याने सेकंदात फोन लागतात. आणि माणसे समोर दिसतात. त्यांना जागा मिळून हळूहळू त्यांचे रूटीन सुरू झाले. कॅलेंडरची पाने हळूच बदलू लागली. आम्हीही रूटीन मध्ये रमायला लागलो. खरे पण फोन आल्यावर आजी-आजोबा हाक ऐकण्यास मन तरसत असे.

काही वर्षांतच मुलाने आम्हाला निमंत्रण दिले हो कारण त्याशिवाय जाता येत नाही ना! अमेरिकेला जायचं मुलाकडे आणि नातीचं कौतुक पहायचं त्यामुळे आनंद गगनात मावेना अशी स्थिती होती. विमानाचा एवढा लांबचा त्यात परदेशचा पहिलाच प्रवास होता. त्यात मध्ये हॉल्ट व विमान बदलून पुढे प्रवास करायचा होता. आपल्याला त्या अनोळखी भागात नीट त्यांच्याच सारखे बोलता येईल का नाही? त्यांचे बोलणे समजेल का नाही अशी किती वाटत होती. पण देवाक काळजी रे। सुखरूप पणे प्रवास पार पडला. मुलगा प्रत्यक्ष समोर दिसल्यावर (विमान तळावर) खूपच आनंद झाला.

घरी गेल्यावर नातीने धावत येऊन मिठी मारली. बाहेर आपल्या इतकी गर्दी रस्त्यात दिसत नाही. त्यामुळे कोणी भारतीय दिसले की त्यांच्याशी बोलायचो. येत लोकांचं तिथे गाव-प्रांत-पंथ-भाषा-धर्म काही आडवे येत नाही. फक्त आपला देशबांधव हीच भावना असते. भारतीय असल्याची हीच जाणीव. मराठी माणसं पण खूप भेटली. हिंडणं फिरणंही खूप झालं. नायगरा फॉल्सचा आनंद-अनुभूति तर अवर्णनीयच. अशातऱ्हेने मजेत वेळ जात होता. पण भारतासारखी मजा कुठेही नव्हती. एक दिवस सुनबाईला एक फोन आला. मैत्रिणीचा आणि आमचे तिथलेच नाही तर भारतातील ही जीवनात फरक पडला.

तिकडे सगळ्यांचे पालक मुला-मुलींच्या भेटीसाठी जातात. पण मुलांना त्यांचे-त्यांचे उद्योग असतात त्यामुळे ते व्यस्त असतात. मग पालक वर्गाला कंटाळा येतो. करमेनासे होते. काहीतरी बदल हवासा वाटू लागतो. त्यावर उपाय म्हणून सुचला, मनिषा वैभवी या मैत्रिणींनी एक कल्पना सुचली. त्यांनी ती अंमलातही आणायला सुरुवात केली. येणाऱ्या सर्व पालक वर्गाला एकत्र आणून त्यांची भेट घडवायची. ह्या मुली ठिकाण ठरवत असत. वेळेनुसार त्या आपल्या मैत्रिणींना निरोप देत आणि आलेले पालक एकत्र भेटत असत. त्यांना घरातला सारखा खाऊचा डबा आणायची पण मुभा होती. आणि ह्या मुली मग तो खाऊ सर्वांना वाटायच्या. त्यालाही डिश, चमचे, टिश्यू पेपर, ट्रे वगैरे सारखे साहित्य. कधी खाऊही त्या आणत. सर्वांशी संवाद साधत. कोणाला लिहून काही मांडायचं आलं तर लिहून देत असत. कोणाला जायची-यायची सोय नसली तर नाही काळजी त्यांची तयारी असे. मग नवीन ओळखी, गप्पा काही खेळ, यात वेळ कसा संपत कळलंच नसे. मुलंही आपापल्या पालकांना

घेऊन जात आणि परत आणत. ह्या मुलींना मदत करत. ही भेट आठवड्यातून एकदा असे. सर्वांना ह्या भेटीने नवीन ऊर्जा मिळत असे. आपल्या समवयस्कांच्या भेटीचा आणि गप्पांचा आनंद काही औरच असतो. आम्ही सर्वजण पुढच्या भेटीची वाट पहात असू. आमचा व्हॉट्सॲप ग्रुपही त्यांनी तयार केला होता. त्यामुळे आपसांत आमचा संपर्क व्हायला लागला. ह्या तिघींना मनापासून आशीर्वाद मिळत होते. नंतर या तिघींबरोबर श्वेताही सामील झाली. आम्ही ह्या ग्रुपशी १६ साली जॉईन झालो. तेव्हापासून आमची सर्वांचीमध्ये आलीस. आजतागायत आम्हाला ग्रुप वाटला. आहे. १०० च्या आसपास लोक असतात. या मुली आणि आमची मुलं ह्या जो ज्येष्ठांचा सन्मान, आदर, काळजी घेतात ते प्रशंसनीय आहे. खूप पुण्याचे काम करताहेत. हे पुण्यकर्म त्यांच्या हातून कायम घडो त्यांच्या जीवनात सुख समृद्धीची कायम बरसात होवो व निरोगी निरामय जीवन त्यांना मिळो ही ईशचरणी प्रार्थना. कोरोना काळात खंड पडला होता. पण आता पुन: जोमाने ग्रुपची भेट होते. जे जे लोक तिथे जातात ते ते ग्रुपला जॉईन होऊन मजा करतात. काही धार्मिक, काही सांस्कृतिक कार्यक्रमही भेट होतात. जेष्ठ मुलांना सोडून आपणच दु:ख आम्हाला होते तेवढेच या मुलींनाही सोडून गेल्याचे दु:ख होते. आपापले घर, संसार, नोकरी सांभाळून आपले पालक त्यांच्या वेळेला जुळेल. करतात त्यांचे हे कार्य सतत चालू आहे. १०० लोकांना त्या व्यवस्थित सांभाळतात. वय विसरून आजी-आजोबा तिथे प्रत्येक कार्यक्रमात सहभागी होतात. मजा करतात. दु:ख विसरतात.

त्याच मुलींकडून प्रेरणा घेऊन भारतात परतल्यावर आम्ही उभयतांनीही पुण्यात "आजी आजोबा ग्रुप पुणे" सुरू केले. ह्या ग्रुपमध्ये फक्त लिहून आलेले सदस्यच सामील होऊ शकतात. महिन्यातून १ एकदाच भेटतो आम्ही. रविवारी बागेमध्ये, कोणाच्या तरी घरी सोई प्रमाणे आम्ही भेटतो. कधी कोजागिरी सहल, कधी हुरडा पार्टी, कोणाच्या तरी घरी दिवाळीचा कार्यक्रम, खेळ, गप्पा गाणी, असे सर्व असते. आमची २ तासांची भेट ऊर्जा देऊन जाते. पुढच्या भेटीची ओढ लागते. आमचे ४०-४५ जण आहेत. दरवेळी प्रत्येकाला यायला जमतेच असे नाही. हे बोनस आयुष्य आहे ते आनंदाने घालवायचे. मित्र मैत्रिणींबरोबर हिंडा-फिरायचे. मजा करायची हा उद्देश ठेवून ग्रुप सुरू झाला. घट्ट नाते जुळले. भेटीला थोडासा उशीर झाला तर चुकल्यासारखे होते. लेकी सुनांच्या काळज्या इथे नसतीच होत नाहीत. काही तारे जमिनीवरही सुरवात झालीय. जो आनंदाने खरोखर राहून दु:ख विसरायला लावणारा असा आहे आमचा "आजी आजोबा ग्रुप पुणे शाखा."

सौ. उषा शशिकांत [illegible]

